Rediffusion/Edelman

| Published Date: | 15 Sept 2017 | Publication: | Vishwadarpan |
|---|---|---|---|
| Edition: | Pune | Page No: | 03 |

# टीसीएस आयटी प्रश्नमंजुषा २०१७ चे पुणे पर्व २६ सप्टेंबरला रंगणार

**पुणे (प्रतिनिधी) :** टाटा कन्सल्टन्सी सर्विसेस (टीसीएस) ही माहिती तंत्रज्ञान सेवा पुरवणारी, सल्लागार आणि व्यावसायिक निराकरण करणारी कंपनी असून टीसीएस आयटी प्रश्नमंजुषा २०१७ च्या पुणे पर्वाची घोषणा आज करण्यात आली. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील शालेय विद्यार्थ्यांसाठी भारतातील सर्वात मोठी प्रश्नमंजुषा असलेली ही स्पर्धा मंगळवार २६ सप्टेंबर रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, शिवाजी पुतळा, कर्वे रोड, कोथरूड, पुणे येथे रंगणार आहे. या स्पर्धेसाठी कोणतेही प्रवेशशुल्क आकारले जाणार नाही. ८ ते १२ वी पर्यंतच्या शालेय विद्यार्थ्यांना (ज्युनियर कॉलेजमधील विद्यार्थ्यांसह) या प्रश्नमंजुषेत भाग घेता येणार आहे. प्रत्येक संस्थेला आठ संघ (प्रत्येक संघात दोन सदस्यांचा सहभाग) या स्पर्धेत उतरवता येणार आहेत. टीसीएस आयटी प्रश्नमंजुषा २०१७ ही देशभरातील १२ शहरांमध्ये रंगणार आहे. अहमदाबाद, बंगळुरू, भुवनेश्वर, चेन्नई, दिल्ली, हैदराबाद, इंदूर, कोटी, कोलकाता, मुंबई, नागपूर आणि पुणे येथे ही स्पर्धा होणार आहे. संबंधित संस्थेमार्फत २२ सप्टेंबरपर्यंत अर्ज पाठवता येतील. हे अर्ज सुचिता मंत्री, टीसीएस आयटी प्रश्नमंजुषा समन्वयक, टाटा कन्सल्टन्सी सर्विसेस, ५४–बी, हडपसर इंडस्ट्रियल इस्टेट, हडपसर, पुणे, ४११०१३, भारत येथे पाठवावेत. अधिक माहितीसाठी ०९२२८८०८३०४ किंवा ८६९८८६७२९७ या क्रमांकावर संपर्क साधावा किंवा ऑनलाइनद्वारे **www.tcsitwiz.com** या संकेतस्थळावर नोंदणी करता येईल. लेखी प्राथमिक फेरीत पहिले सहा क्रमांक पटकावणारे सहा संघ प्रादेशिक अंतिम फेरीसाठी पात्र ठरतील. जर एखाद्या संस्थेतील अनेक संघ अंतिम फेरीसाठी पात्र ठरले तर कार्यक्रमादरम्यान त्या संस्थेतील सर्वाधिक गुण पटकावणाऱ्या संघाला रंगमंचावर आमंत्रित करण्यात येईल. प्रादेशिक फेरीतील विजेत्या संघाला राष्ट्रीय अंतिम फेरीत खेळण्याची संधी मिळेल. राष्ट्रीय फेरी डिसेंबरमध्ये मुंबईत रंगणार आहे. विजेता संघ आपल्या मार्गदर्शकांसह मुंबईला रवाना होईल. प्रादेशिक फेरीतील विजेत्या संघाला या वर्षी ६० हजार रुपयांचे गिफ्ट वाऊचर मिळणार असून उपविजेत्या संघाला ४० हजार रुपयांचे गिफ्ट वाऊचर आणि विशेष डिझाइन केलेला चषक तसेच पदके देऊन गौरवण्यात येईल. अंतिम फेरीत मजल मारणाऱ्या सहा संघांना टीसीएसतर्फे डबल डफल जिम बॅग, ओटीजी पेनड्राइव्ह, ईअरफोन्स आणि ब्लूटूथ स्पीकर्स यांसारखी आकर्षक बक्षिसे देण्यात येतील. प्रादेशिक फेरीतिल विजेत्या संघाला आपल्या शिक्षकांसह/पालकांसह राष्ट्रीय फेरीसाठी विमानाने मुंबईला जाण्याची संधी मिळेल. प्रत्येक शहरात रंगणाऱ्या प्रादेशिक अंतिम फेरीदरम्यान सर्व स्पर्धकांसाठी ट्विटरद्वारे स्पर्धा घेण्यात येईल. सर्वाधिक ट्विट करणाऱ्या अव्वल दोघांना तसेच सर्वोत्तम 'ट्विट ऑफ द डे'चा किताब पटकावणाऱ्याला डबल डफल जिम बॅग तसेच ब्लूटूथ स्पीकर देऊन गौरवण्यात येईल